प्रेसनोट दि. १८/०७/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी चिंचवड पोलीस घटकातील रावेत पोलीस स्टेशनमधील महिला पोलीस हवालदार व सहायक पोलीस फौजदार यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४६ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती. राजश्री रवी घोडे, म.पो.हवा./१५२३, (वर्ग-३)<br>२) श्री. राकेश शांताराम पालांडे, स.पो.फौज. (वर्ग ३)<br>दोघे नेमणूक रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | १७/०७/२०२५ |
| सापळा दिनांक | १८/०७/२०२५ |
| ठिकाण | रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सतिश वाळके, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ८०८७००२०२०) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे पेशाने वकील आहेत. त्यांच्या आशिलावर रावेत पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गु.र.क्र. १४६/२०२५, भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. नमूद गुन्हा यातील लोकसेवक क्र.१ महिला पोलीस हवालदार श्रीमती राजश्री घोडे यांच्याकडे तपासाकरता आहे. नमूद गुन्ह्यात आरोपी अटक न करण्यासाठी तसेच त्याच्याविरुद्ध दाखल होणा-या दोषारोपपत्रात आरोपीस फायदा होईल अशा त्रुटी ठेवून दोषारोपप पाठवण्यासाठी लोकसेवक क्र.१ श्रीमती. राजश्री घोडे यांनी तक्रारदाराकडे ५० हजार रुपयाच्या लाचेची मागणी केल्याची तक्रा तक्रारदार यांनी दि. १७/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १७/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, लोकसेवक क्र. १ श्रीमती. राजश्री घोडे यांनी तक्रारदाराकडे तक्रारदाराच्या आशिलाविरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्यात वरील प्रमाणे मदत करण्यासाठी सुरुवातीस ५०,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०,०००/- रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक क्र. २ श्री. राकेश पालांडे, सहायक पोलीस फौजदार यांनी लोकसेवक क्रमांक १ श्रीमती. राजश्री घोडे यांच्या लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दिनांक १८/०७/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक क्र.१ श्रीमती. राजश्री घोडे यांनी तक्रारदाराकडून रावेत पोलीस स्टेशनमध्ये ३०,०००/- रुपये लाच घेतली असता त्यांना पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक क्र. २ श्री. राकेश पालांडे यांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले असून, त्या दोघांविरुद्ध रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, सन १९८ चे कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner